## 1. कार्यकारी सारांश

**प्रस्तावना**

1.1 परवाना मिळालेल्या पारेषण प्रणालीची स्थापना आणि कार्यान्वयन यांच्यासाठी महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (एमईजीपीटीसीएल/याचिकाकर्ता) यांना आयोगाच्या आदेश दिनांकीत 14 सप्टेंबर, 2010 द्वारे पारेषण परवाना क्र. 1 सन 2010 देण्यात आलेला आहे.

1.2 महाराष्ट्राच्या उत्तरपूर्व भागातील औष्णिक वीज प्रकल्पामधून निर्माण होणारी वीज राज्याच्या मध्य आणि पश्चिम भागातील लोड सेंटर्स कडे वाहून नेण्याकरिता परवानाधारक पारेषण प्रणालीची आवश्यकता होती. 31 मार्च 2015 पर्यंत टप्प्यांटप्प्यांने एमईजीपीटीसीएलचे यशस्वीरित्या कार्यान्वयन करुन कथित उद्दिष्ट पूर्ण करण्यात आलेले आहे.

1.3 कमर्शियल ऑपरेशन डेटच्या (व्यावसायिक कार्यान्वयन तारीख) आधारावर भाडेदराची निश्चिती करण्यासाठी संपूर्ण पारेषण प्रणालीचे वेगवेगळ्या सेट्समध्ये विभाजन करण्यात आले होते. हे कार्यान्वयनाचे वेळापत्रक अशाप्रकारे आखण्यात आले होते की यापैकी प्रत्येक सेट हा त्याच्या कार्यान्वयनाच्या तारखेपासून विजेचे पारेषण करण्याच्या दृष्टीने स्वतंत्ररीत्या सक्षम असेल आणि तो आंतरराज्य पारेषण प्रणालीचा (आयएनएसटीएस) एक महत्त्वाचा भाग होईल.

**वैधानिक तरतुदी**

1.4 याचिकाकर्ते हे पारेषण परवानाधारक असल्यामुळे निर्देशित नियामक कार्यपद्धती अंतर्गत कामकाज करण्यात प्रयत्न करतात. पारेषण व्यवसायाचे खालील कायदे, धोरणे व नियमावल्या यांचा अंतर्गत अनुशासन व नियमन होते::

- विद्युत कायदा 2003;
- राष्ट्रीय विद्युत धोरण;
- राष्ट्रीय टॅरिफ पॉलिसी; आणि
- एमईआरसी (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, 2015 व
- एमईआरसी (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, 2019

1.5 सन्माननीय आयोगाने विद्युतनिर्मिती, पारेषण व वितरण यांचे टॅरिफ निश्चित करण्यासाठी 01.08.2019 रोजी एमवायटी रेग्युलेशन्स, 2019 निर्देशित केले आहेत. रेग्युलेशन 5 (1) (बी) निर्देशित करतो की पारेषण परवानाधारकांकडून पुढील बाबींचा समावेश असणारी मध्यावधी आढावा ('एमटीआर') याचिका 01.11.2022 पर्यंत दाखल करण्यात आली पाहिजे:

ए) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, 2015 अंतर्गत करण्यात यावयाचे वित्तिय वर्ष 2019-20 यांचे ट्रुईंग अप:

बी) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, 2019 अंतर्गत करण्यात यावयाचे वित्तिय वर्ष 2020-21 आणि वित्तिय वर्ष 2021-22 यांचे ट्रुईंग अप:

सी) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स 2019 अंतर्गत करण्यात यावयाचे वित्तिय वर्ष 2022-23 चे तात्पुरते ट्रुईंग अप;

डी) एकंदर महसुली आवश्यकता, वर्तमान भाडे आणि भार यामधून अपेक्षित महसूल, अपेक्षित महसूली तफावत आणि नियंत्रित कालावधीच्या चवथ्या व पाचव्या वर्षासाठी गटवारीनुसार प्रस्तावित भाडेपत्रक यांचा सुधारित अंदाज;

1.6 वरील गोष्टी विचारात घेता एमईजीपीटीसीएल पुढील गोष्टी सादर करीत आहे

ए) एमवायटी रेग्युलेशन्स, 2015 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2019-20 यांच्या एआरआरच्या ट्रु-अपसाठी याचिका.

बी) एमवायटी रेग्युलेशन्स, 2019 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2020-21 आणि 2021-22 यांच्या एआरआरच्या ट्रु-अपसाठी याचिका.

सी) एमवायटी रेग्युलेशन्स, 2019 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2022-23 च्या एआरआरच्या तात्पुरत्या ट्रु-अपसाठी याचिका.

डी) एमवायटी रेग्युलेशन्स 2019 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2023-24 व वित्तिय वर्ष 2024-25 साठी सुधारीत एआरआर ठरविणे.

ई) अपील क्र. 260 सन 2016 बाबत सम्माननीय अॅपिलेट ट्रायब्युनल ऑफ इलेक्ट्रिसिटी यांच्या निवाडा दिनांकीत 24 जुलै 2020 अनुसार सम्माननीय एमइआरसी यांच्या आदेश दिनांकीत 03.06.2021 द्वारे हिशोब केलेल्या फरकांवर आधारीत परिणाम.

एफ) परिणामी प्रभाव - अपील क्र. 18 सन 2019 आणि अपील क्र. 173 सन 2022 बाबत सम्माननीय अॅपिलेट ट्रायब्युनल ऑफ इलेक्ट्रिसिटी यांनी दिलेला निकाल दिनांकीत 28 नोव्हेंबर 2022 नुसार.

**ट्रु-अप, तात्पुरता ट्रु-अप आणि एआरआरचा सुधारीत अंदाज यांच्या हिशेबासाठी आधार**

1.7 प्रकरण क्र. 50 सन 2016 मध्ये सम्माननीय आयुक्तांनी 03 जून 2021 रोजी मंजूर केलेल्या वित्तिय वर्ष 2018-19 साठी मंजूर केलेल्या भांडवली खर्चाच्या आधारे, वित्तिय वर्ष 2019-20, वित्तिय वर्ष 2020-21 व वित्तिय वर्ष 2021-22 यांच्या एआरआरचे ट्रु अप, वित्तिय वर्ष 2022-23 च्या एआरआरचे सशर्त ट्रु अप आणि वित्तिय वर्ष 2023-24 व वित्तिय वर्ष 2024-25 साठी सुधारीत एआरआर, ह्या बाबी याचिकाकर्त्याने निश्चित केल्या आहेत. वित्तिय वर्ष 2019-20, वित्तिय वर्ष 2020-21 आणि वित्तिय वर्ष 2021-22 यांच्या लेखा परिक्षित वार्षिक लेखा **अनुक्रमे परिशिष्ट 1, परिशिष्ट 2 आणि परिशिष्ट 3** मध्ये दिलेल्या आहेत. एआरआरच्या ट्रु अप मध्ये विचारात घेतलेले घटक आहेत:

(ए) कार्यान्वयन व देखभाल खर्च

(बी) घसारा

(सी) भांडवली कर्जावरील व्याज

(डी) खेळते भांडवल व पारेषण प्रणाली वापरकर्त्यांच्या ठेवी यांच्यावरील व्याज

(ई) आयकर

(एफ) आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान

(जी) समभाग भांडवलावरील परतावा

(एच) बिगर-टॅरिफ उत्पन्न

(आय) रेग्युलेशन्समध्ये निर्देशित मर्यादेपर्यंत इतर व्यवसायातून उत्पन्न

(जे) नफा आणि नुकसान यांचा हिस्सा

(के) वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट) आणि प्रोत्साहनपर राशी (इन्सेन्टिव्ह)

1.8 याचिकाकर्त्याने पुढील आधारांवर एआरआरचे मध्यावधी आढावा काढलेला आहे:

ए) सेट 1, सेट 2ए, सेट 2बी आणि सेट 3 व एमवायटी रेग्युलेशन्स 2015 व 2019 आणि इतर रेग्युलेशन्स यांच्या खालील मालमत्तांसाठी सम्माननीय आयोगाने सन 2016 चे प्रकरण क्र. 50 यासाठी 03 जून 2021 या तारखेस वित्तिय वर्ष 2018-19 साठी मंजूर केलेल्या शेवटच्या भांडवली खर्चाच्या आधारे वित्तिय वर्ष 2019-20, वित्तिय वर्ष 2020-21 आणि वित्तिय वर्ष 2021-22 यांच्या एआरआरचे ट्रु अप.

बी) सम्माननीय आयोगाने वर्ष 2016 च्या प्रकरण क्र. 50 साठी 03 जून 2021 या तारखेस वित्तिय वर्ष 2018-19 साठी मंजूर केलेल्या समाप्तीचा भांडवली खर्च आणि वित्तिय वर्ष 2019-20, वित्तिय वर्ष 2020-21 आणि वित्तिय वर्ष 2021-22 व वित्तिय वर्ष 2023-24 साठी अतिरिक्त भांडवली खर्च आणि एमवायटी रेग्युलेशन्स 2019 च्या तरतुदी व इतर रेग्युलेशन्स यांच्या आधारे वित्तिय वर्ष 2022-2023 च्या एआरआरचे तात्पुरते ट्रु अप.

सी) एमवायटी रेग्युलेशन्स 2015 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2019-2020 साठी आणि एमवायटी रेग्युलेशन्स 2019 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2020-21, 2021-22 आणि 2022-23 साठी महसुली तफावत/(वृध्दी) निश्चित करण्यात आली आहे.

डी) वित्तिय वर्ष 2023-24 दरम्यान वसुलीसाठी वहन खर्च पुढीलप्रमाणे आहे:

- वित्तिय वर्ष 2019-20 मधील वसुलीला मंजुरी देण्यासाठी झालेल्या विलंबामुळे नफा (तोटा) यांची जुळवणी केल्यानंतर मंजूर झालेला एआरआर आणि वास्तविक महसुली आवश्यकता यांच्यामधील फरकासाठी वहन खर्च (कॅरींग कॉस्ट).
- वित्तिय वर्ष 2020-21 मधील वसुलीला मंजुरी देण्यासाठी झालेल्या विलंबामुळे नफा (तोटा) यांची जुळवणी केल्यानंतर मंजूर झालेला एआरआर आणि वास्तविक महसुली आवश्यकता यांच्यामधील फरकासाठी वहन खर्च (कॅरींग कॉस्ट).
- वित्तिय वर्ष 2021-22 मधील वसुलीला मंजुरी देण्यासाठी झालेल्या विलंबामुळे नफा (तोटा) यांची जुळवणी केल्यानंतर मंजूर झालेला एआरआर आणि वास्तविक महसुली आवश्यकता यांच्यामधील फरकासाठी वहन खर्च (कॅरींग कॉस्ट).

ई) एमवायटी रेग्युलेशन्स 2019 व इतर रेग्युलेशन्स यांच्या अनुसार वित्तिय वर्ष 2023-24 साठी सुधारीत आणि वित्तिय वर्ष 2024-25 साठी सुधारीत एआरआर.

एफ) अपील क्र. 260 सन 2016 बाबत सम्माननीय अॅपिलेट ट्रायब्युनल ऑफ इलेक्ट्रिसिटी यांच्या निवाडा दिनांकीत 24 जुलै 2020 अनुसार सम्माननीय एमइआरसी यांच्या आदेश दिनांकीत 03 जून 2021 द्वारे हिशोब केलेल्या फरकांवर आधारीत परिणाम.

जी) परिणामी प्रभाव - अपील क्र. 18 सन 2019 आणि अपील क्र. 173 सन 2022 बाबत सम्माननीय अॅपिलेट ट्रायब्युनल ऑफ इलेक्ट्रिसिटी यांनी दिलेला निकाल दिनांकीत 28 नोव्हेंबर 2022 नुसार.

1.9 सन्माननीय आयोगाने केस क्र. 50 सन 2016 मध्ये दिलेल्या आदेश दिनांकीत 05.07.2016 मुळे दुखावल्या गेलेल्या याचिकाकर्त्याने सन्माननीय एपीटीईएल यांच्याकडे अपील क्र. 260 सन 2016 म्हणून नोंदणी झालेले अपील दाखल केले आहे. सम्माननीय अॅपिलेट ट्रायब्युनल ऑफ इलेक्ट्रिसिटी यांनी अपील क्र. 260 सन 2016 बाबत 24 जुलै 2020 तारखेचा आपला निकाल दिला आहे. अपील क्र. 260 सन 2016 मधील सम्माननीय अॅपिलेट ट्रायब्युनल ऑफ इलेक्ट्रिसिटी यांच्या 24 जुलै 2020 तारखेच्या निकालानुसार सम्माननीय एमइआरसी यांनी 03 जून 2021 तारखेच्या आदेशानुसार एआरआर मधील फरकावर आधारलेल्या परिणामाला संमती दिली आहे.

1.10 सन्माननीय आयोगाने केस क्र. 169 सन 2017 मध्ये दिलेल्या आदेश दिनांकीत 12.09.2018 मुळे दुखावल्या गेलेल्या याचिकाकर्त्याने सन्माननीय एपीटीईएल यांच्याकडे अपील क्र. 18 सन 2019 म्हणून नोंदणी झालेले अपील दाखल केले आहे. सन्माननीय आयोगाने केस क्र. 190 सन 2019 मध्ये दिलेल्या आदेश दिनांकीत 30.03.2020 मुळे दुखावल्या गेलेल्या याचिकाकर्त्याने सन्माननीय एपीटीईएल यांच्याकडे अपील क्र. 173 सन 2022 म्हणून नोंदणी झालेले अपील दाखल केले आहे. सम्माननीय अॅपिलेट ट्रायब्युनल ऑफ इलेक्ट्रिसिटी यांनी अपील क्र. 18 सन 2019 आणि अपील क्र. 173 सन 2022 बाबत आपल्या 28 नोव्हेंबर 2022 तारखेच्या आदेशानुसार निर्णय दिला आहे. त्यानंतरच्या अपील क्र. 18 सन 2019 आणि अपील क्र. 173 सन 2022 बाबत 28 नोव्हेंबर 2022 तारखेला आलेल्या एपीटीइएल निवाड्याचा परिणाम वर्तमान याचिकेमध्ये विचारात घेण्यात आलेला आहे.

1.11 प्रकरण क्र. 290 सन 2019 मधील एमवायटी आदेश दिनांकीत 30.03.2020 चा भाग म्हणून एआरआरला मंजुरी मिळाल्यानंतर सम्माननीय आयोगाने प्रकरण क्र. 50 सन 2016 मध्ये दिलेल्या आदेश दिनांकीत 03.06.2021 अन्वये एमइजीपीटीसीएल यांनी सुधारीत एआरआरला मान्यता दिलेली आहे. त्यामुळे एमइजीपीटीसीएल यांनी ट्रुइंग अप, त्याचप्रमाणे तात्पुरते ट्रुइंग अप या कारणांसाठी (03.06.2021 तारखेच्या आदेशामध्ये मंजूर केलेल्या) सुधारीत एआरआर बरोबर प्रत्यक्ष एआरआरची तुलना केली आहे.

1.12 याच्या परिणाम स्वरूप अपील क्र. 18 सन 2019 आणि अपील क्र. 173 सन 2022 वरील सम्माननीय एपीटीइएलच्या 28.11.2022 तारखेच्या निकालानुसार वित्तिय वर्ष 2015-16 ते वित्तिय वर्ष 2018-19 च्या अगोदरच ट्रु अप झालेल्या एआरआरचा परिणाम खालील कोष्टकामध्ये साररूपाने मांडण्यात आला आहे.

**कोष्टक 1-1: सम्माननीय एपीटीइएल निकाल दिनांकीत 28.11.2022 अनुसार वित्तिय वर्ष 2015-16 ते वित्तिय वर्ष 2018-19 च्या या आधीच ट्रु अप झालेल्या एआरआर वर परिणाम स्वरूप प्रभाव. (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| 1 | वित्तिय वर्ष 2015-16 ते वित्तिय वर्ष 2018-19 साठी सुधारीत ट्रुड अप एआरआर (सम्माननीय एटीइ निकाल दिनांकीत 28-11-2022 चा परिणाम) | 165.74 |
| 2 | सुधारीत ट्रुड अप एआरआर वरील वहन खर्च | 96.54 |
| 3 | वि. व. 2015-16 ते वि. व. 2018-19 या काळासाठी मंजूर झालेल्या इन्सेन्टिव्ह वरील (मोबादला) परिणाम (सम्माननीय एटीइ निकाल दिनांकीत 28.11.2022 चा परिणाम) | 1.34 |
| 4 | वसुल करावयाच्या अतिरिक्त मोबदल्यासाठी वहन खर्च. | 0.47 |
| 5 | आधीच्या लागू असणाऱ्या वसुलीवरील आयकरावर अंदाजे परिणाम (अनु क्र. 1+2+4) @ 17.472% | 55.63 |
| 6 | **सम्माननीय एटीइ निकाल दिनांकीत 28.11.2022 च्या प्रभावामुळे वित्तिय वर्ष 2023-24 मधील अंदाजे एकंदर वसुली.** | 319.72 |

1.13 वरील बाबी विचारात घेता वित्तिय वर्ष 2019-20 साठी याचिकाकर्त्याचा ट्रुड अप एआरआर खालील कोष्टकामध्ये मांडण्यात आला आहे.

**कोष्टक 1-2 : वित्तिय वर्ष 2019-20 साठी एआरआरचे ट्रु अप (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | प्रकरण 50 सन 2016 दिनांकीत 03.06.2021 | सुधारीत नॉर्मेटिव्ह/ प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | फेरबदल | नियंत्रण करता येण्या-सारखा | नियंत्रण करता न येण्या-सारखा | लाभ/(हानी) वाटप केल्यानंतर निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ए | बी | सी | डी = सी-ए | ई = डी-एफ | एफ = बी-ए | जी = ए + ई/३ + एफ |
| 1 | कामकाज व देखभाल खर्च | 107.23 | 107.62 | 114.64 | 7.41 | 7.02 | 0.39 | 109.96 |
| 2 | घसारा खर्च | 303.75 | 304.30 | 304.30 | 0.55 | | 0.55 | 304.30 |
| 3 | दीर्घकालिक कर्ज भांडवलावरील व्याज | 294.68 | 334.83 | 334.83 | 40.15 | | 40.15 | 334.83 |
| 4 | खेळते भांडवळ व सिक्युरीटी डिपॉझिट्स (तारण ठेवी) वरील व्याज | 18.02 | 18.22 | 40.27 | 22.25 | 22.05 | 0.20 | 25.57 |
| 5 | आयकर | 38.44 | 47.86 | 47.86 | 9.42 | | 9.42 | 47.86 |
| 6 | आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | 13.41 | 13.41 | 13.41 | - | | - | 13.41 |
| **7** | **एकूण महसुली खर्च** | **775.53** | **826.24** | **855.31** | **79.78** | **29.07** | **50.71** | **835.93** |
| 8 | समभाग भांडवलावरील परतावा | 268.70 | 268.83 | 268.83 | 0.13 | | 0.13 | 268.83 |
| **9** | **एकंदर महसुली आवश्यकता** | **1,044.23** | **1,095.07** | **1,124.14** | **79.90** | **29.07** | **50.84** | **1,104.76** |

| अनु क्र. | तपशील | प्रकरण 50 सन 2016 दिनांकीत 03.06.2021 | सुधारीत नॉर्मेटिव्ह/ प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | फेरबदल | नियंत्रण करता येण्या- सारखा | नियंत्रण करता न येण्या- सारखा | लाभ/(हानी) वाटप केल्यानंतर निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ए | बी | सी | डी = सी-ए | ई = डी-एफ | एफ = बी-ए | जी = ए + ई/३ + एफ |
| 10 | वजा: बिगर- टॅरिफ उत्पन्न | - | (1.58) | (1.58) | (1.58) | | (1.58) | (1.58) |
| 11 | वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | - | - | - | - | | - | - |
| | | | | | | | - | |
| **12** | **ट्रान्समिशन टॅरिफ कडून एकंदर महसुली आवश्यकता** | **1,044.23** | **1,096.65** | **1,125.72** | **81.48** | **29.07** | **52.42** | **1,106.34** |

1.14 वरील बाबी विचारात घेता वित्तिय वर्ष 2020-21 साठी याचिकाकर्त्यांचा ट्रुड अप एआरआर खालील कोष्टकामध्ये मांडण्यात आला आहे.

**कोष्टक 1-3 : वित्तिय वर्ष 2020-21 साठी एआरआरचे ट्रु अप (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | प्रकरण 50 सन 2016 दिनांकीत 03.06.2021 | सुधारीत नॉर्मेटिव्ह/ प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | फेरबदल | नियंत्रण करता येण्या- सारखा | नियंत्रण करता न येण्या- सारखा | लाभ/(हानी) वाटप केल्यानंतर निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ए | बी | सी | डी = सी-ए | ई = डी-एफ | एफ = बी-ए | जी = ए + ई/३ + एफ |
| 1 | कामकाज व देखभाल खर्च | 108.11 | 107.73 | 115.47 | 7.36 | 7.74 | (0.38) | 110.31 |
| 2 | घसारा खर्च | 303.75 | 305.31 | 305.31 | 1.56 | | 1.56 | 305.31 |
| 3 | दीर्घकालिक कर्ज भांडवलावरील व्याज | 259.23 | 294.91 | 294.91 | 35.68 | | 35.68 | 294.91 |
| 4 | खेळते भांडवळ व सिक्युरीटी डिपॉझिट्स (तारण ठेवी) वरील व्याज | 18.00 | 16.16 | 32.01 | 14.01 | 15.85 | (1.84) | 21.44 |
| 5 | आयकर | - | - | - | - | | - | - |
| 6 | आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | 14.45 | 15.04 | 15.04 | 0.59 | | 0.59 | 15.04 |
| **7** | **एकूण महसुली खर्च** | **703.54** | **739.16** | **762.74** | **59.20** | **23.59** | **35.61** | **747.02** |
| 8 | समभाग भांडवलावरील परतावा | 294.08 | 326.03 | 326.03 | 31.95 | | 31.95 | 326.03 |
| **9** | **एकंदर महसुली आवश्यकता** | **997.62** | **1,065.19** | **1,088.77** | **91.15** | **23.59** | **67.57** | **1,073.05** |
| 10 | वजा: बिगर- टॅरिफ उत्पन्न | 1.62 | 1.23 | 1.23 | (0.39) | | (0.39) | 1.23 |
| 11 | वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | - | - | - | - | | - | - |
| | | | | | | | - | |

| अनु क्र. | तपशील | प्रकरण 50 सन 2016 दिनांकीत 03.06.2021 | सुधारीत नॉर्मेटिव्ह/ प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | फेरबदल | नियंत्रण करता येण्या-सारखा | नियंत्रण करता न येण्या-सारखा | लाभ/(हानी) वाटप केल्यानंतर निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ए | बी | सी | डी = सी-ए | ई = डी-एफ | एफ = बी-ए | जी = ए + ई/३ + एफ |
| 12 | **ट्रान्समिशन टॅरिफ कडून एकंदर महसुली आवश्यकता** | **996.00** | **1,063.95** | **1,087.54** | **91.54** | **23.59** | **67.95** | **1,071.81** |

1.15 वरील बाबी विचारात घेता वित्तिय वर्ष 2021-22 साठी याचिकाकर्त्यांचा ट्रुड अप एआरआर खालील कोष्टकामध्ये मांडण्यात आला आहे.

**कोष्टक 1-4 : वित्तिय वर्ष 2021-22 साठी एआरआरचे ट्रु अप (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | प्रकरण 50 सन 2016 दिनांकीत 03.06.2021 | सुधारीत नॉर्मेटिव्ह/ प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | फेरबदल | नियंत्रण करता येण्या-सारखा | नियंत्रण करता न येण्या-सारखा | लाभ/(हानी) वाटप केल्यानंतर निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ए | बी | सी | डी = सी-ए | ई = डी-एफ | एफ = बी-ए | जी = ए + ई/३ + एफ |
| 1 | कामकाज व देखभाल खर्च | 112.35 | 111.61 | 117.08 | 4.73 | 5.47 | (0.74) | 113.43 |
| 2 | घसारा खर्च | 303.75 | 306.21 | 306.21 | 2.46 | | 2.46 | 306.21 |
| 3 | दीर्घकालिक कर्ज भांडवलावरील व्याज | 223.79 | 255.06 | 255.06 | 31.27 | | 31.27 | 255.06 |
| 4 | खेळते भांडवळ व सिक्युरीटी डिपॉझिट्स (तारण ठेवी) वरील व्याज | 17.72 | 15.78 | 47.35 | 29.63 | 31.57 | (1.94) | 26.30 |
| 5 | आयकर | - | - | - | - | | - | - |
| 6 | आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | 14.45 | 15.30 | 15.30 | 0.85 | | 0.85 | 15.30 |
| **7** | **एकूण महसुली खर्च** | **672.05** | **703.95** | **741.00** | **68.95** | **37.05** | **31.90** | **716.30** |
| 8 | समभाग भांडवलावरील परतावा | 294.08 | 326.41 | 326.41 | 32.34 | | 32.34 | 326.41 |
| **9** | **एकंदर महसुली आवश्यकता** | **966.13** | **1,030.37** | **1,067.41** | **101.28** | **37.05** | **64.24** | **1,042.72** |
| 10 | वजा: बिगर- टॅरिफ उत्पन्न | 3.70 | 2.24 | 2.24 | (1.46) | | (1.46) | 2.24 |
| 11 | वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | - | - | - | - | | - | - |
| | | - | - | - | - | | - | |
| **12** | **ट्रान्समिशन टॅरिफ कडून एकंदर महसुली आवश्यकता** | **962.43** | **1,028.13** | **1,065.17** | **102.74** | **37.05** | **65.70** | **1,040.48** |

1.16 याचिकाकर्ता एमवायटी रेग्युलेशन 2015 च्या रेग्युलेशन क्र. 57.2 कडे लक्ष वेधू इच्छितात, ज्यामध्ये उपलब्धतेच्या 99% पलिकडील वार्षिक उपलब्धता गाठल्यास इन्सेन्टिव्ह उपलब्ध असण्याची तरतूद करण्यात

आलेली आहे. ही गोष्ट विचारात घेता प्रत्यक्ष उपलब्धता ही उद्दिष्ट उपलब्धतेच्या 99% पलिकडे गेलेली असल्यामुळे याचिकाकर्त्याने वित्तिय वर्ष 2019-20 साठी इन्सेन्टिव्ह मिळण्यासाठी दावा केलेला आहे. या रेग्युलेशनमध्ये अशीही तरतूद आहे की सदर इन्सेन्टिव्हची उपलब्धता ही 99.75% पर्यंतच्या उपलब्धतेसाठी देण्यात आली पाहिजे. वित्तिय वर्ष 2019-20 साठी याचिकाकर्त्याची प्रत्यक्ष उपलब्धता अनुक्रमे 99.72% एवढी आहे. एमएसएलडीसी कडून याचिकाकर्त्याला देण्यात आलेले वार्षिक उपलब्धता प्रमाणपत्र हे **परिशिष्ट 4** म्हणून याचिकेसोबत जोडलेले आहे.

1.17 याचिकाकर्ता आपले ध्यान एमवायटी रेग्युलेशन 2019 च्या रेग्युलेशन क्र. 29.7 कडे वेधू इच्छीतात, ज्यामध्ये अशी तरतूद आहे की पारेषणाची उपलब्धता असल्यास इक्विटीच्या परताव्यावर अतिरिक्त/वाढीव दर दिला जाऊ शकेल. ही बाब विचारात घेऊन याचिकाकर्त्याने वित्तिय वर्ष 2020-21 व वित्तिय वर्ष 2021-22 साठी अनुक्रमे 99.88% आणि 99.96% एवढी पारेषण उपलब्धता प्राप्त केली आहे आणि त्यानुसार इक्विटीच्या परताव्यावर वाढीव दराची मागणी केली आहे. एमएसएलडीसी यांच्याकडून याचिकाकर्त्याला वित्तिय वर्ष 2020-21 व वित्तिय वर्ष 2021-22 साठी देण्यात आलेले वार्षिक उपलब्धता प्रमाणपत्र या याचिकेसोबत **परिशिष्ट 4** म्हणून जोडलेले आहे.

**कोष्टक 1-5 : वित्तिय वर्ष 2019-20, वित्तिय वर्ष 2020-21 आणि वित्तिय वर्ष 2021-22 साठी ट्रु अप समरी (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | सूत्र | वित्तिय वर्ष 2019-20 साठी प्रत्यक्ष | वित्तिय वर्ष 2020-21 साठी प्रत्यक्ष | वित्तिय वर्ष 2021-22 साठी प्रत्यक्ष |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर | ए | 1,106.34 | 1,071.81 | 1,040.48 |
| 2 | एमवायटी आदेश प्रकरण 290 सन 2019 मध्ये मंजूर केलेली आधीच्या कालावधींची तफावत | बी | - | 38.22 | 42.82 |
| 3 | **ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा व आधीची वसुली यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर** | **सी = ए + बी** | **1,106.34** | **1,110.03** | **1,083.30** |
| 4 | वजा : इन एसटीएस आदेशानुसार महसूल | d | 975.58 | 973.33 | 946.91 |
| **5** | **वहन खर्च / (धारणा) खर्च याच्या हिशोबासाठी महसुलातील तफावत / (वृध्दी)-** | **ई = सी - डी** | **130.76** | **136.70** | **136.39** |
| 6 | महसुलातील तफावत / (वाढ) यामुळे वहन / (धारणा) खर्च | एफ | 47.17 | 36.86 | 25.13 |
| 7 | उपलब्धतेबद्दल इन्सेन्टिव्ह | जी | 8.05 | - | - |
| 8 | **वहन खर्च आणि उपलब्धता इन्सेन्टिव्ह यांच्या समावेशासह वसुल करावयाची निव्वळ महसुल तफावत** | **एच = ई + एफ + जी** | **185.98** | **173.56** | **161.52** |

1.18 वित्तिय वर्ष 2022-23 च्या बाबतीत एमईजीपीटीसीएल यांनी एमवायटी आदेशामधील मंजुर झालेल्या एआरआरची दुस-या अर्धवर्षाचे अंदाज आणि अलेखापरिक्षित अर्धवार्षिक लेखा यांच्या आधारे पहिल्या अर्धवर्षाच्या प्रत्यक्ष कामगिरीबरोबर तुलना केलेली आहे. वित्तिय वर्ष 2022-23 चे मंजुर झालेले आणि सुधारीत एआरआर यांची तुलना खालील कोष्टकामध्ये करण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. 1-6: वित्तिय वर्ष 2022-23 च्या मंजूर झालेल्या व अंदाजे एआरआरची तुलना (रु. कोटी)**

| तपशील | वित्तिय वर्ष 2022-23 | | |
|---|---|---|---|
| | मंजूर (प्रकरण 50 सन 2016) | अंदाजे | तात्पुरता ट्रु-अप आवश्यकता |
| कार्यान्वयन व देखभाल खर्च | 116.84 | 116.84 | - |
| घसाऱ्यापोटी खर्च | 303.75 | 306.56 | 2.81 |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | 188.34 | 214.85 | 26.51 |
| खेळते भांडवल आणि ग्राहकांचे सिक्युरीटी डिपॉझिट यावरील व्याज | 17.36 | 17.20 | (0.16) |
| आयकर | 0.00 | - | - |
| आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | 14.45 | 28.99 | 14.49 |
| **एकूण महसुली खर्च** | **640.74** | **684.43** | **43.65** |
| समभाग भांडवलावरील परतावा | 294.08 | 295.07 | 0.99 |
| **एकंदर महसुली आवश्यकता** | **934.82** | **979.50** | **44.64** |
| वजा: बिगर-टॅरिफ उत्पन्न | 4.62 | 4.00 | (0.62) |
| वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | | | |
| वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न | | | |
| **पारेषण टॅरिफपासून एकंदर महसुली आवश्यकता** | **930.20** | **975.50** | **45.26** |

**कोष्टक 1-7 : वित्तिय वर्ष 2022-23 साठी तात्पुरता ट्रु अप (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | फॉर्म्यूला | वित्तिय वर्ष 2022-23 |
|---|---|---|---|
| 1 | ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर | ए | 975.50 |
| 2 | एमवायटी आदेश प्रकरण 290 सन 2019 मध्ये मंजूर केलेली आधीच्या कालावधींची तफावत | बी | 39.75 |
| 3 | **ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा व आधीची वसुली यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर** | **सी = ए + बी** | **1,015.25** |
| 4 | वजा : इन एसटीएस आदेशानुसार महसूल | d | 914.17 |
| **5** | **वहन खर्च / (धारणा) खर्च याच्या हिशोबासाठी महसुलातील तफावत / (वृध्दी)-** | **ई = सी - डी** | **101.08** |

1.19 वर्तमान याचिकेमध्ये याचिकाकर्त्याने वित्तिय वर्ष 2022-23 साठी कोणत्याही वहन खर्चाबाबत दावा केलेला नाही.

1.20 वित्तिय वर्ष 2023-24 आणि वित्तिय वर्ष 2024-25 साठी एआरआरचे सुधारीत अंदाज खालील कोष्टकांमध्ये देण्यात आलेले आहेत:

**कोष्टक 1-8 : वित्तिय वर्ष 2023-24 आणि वित्तिय वर्ष 2024-25 साठी एआरआरचा सुधारीत अंदाज (रु. कोटी)**

| तपशील | वित्तिय वर्ष 2023-24 (मंजूर) | वित्तिय वर्ष 2023-24 (अंदाजे) | वित्तिय वर्ष 2024-25 (अंदाजे) | वित्तिय वर्ष 2024-25 (अंदाजे) |
|---|---|---|---|---|
| कार्यान्वयन व देखभाल खर्च | 121.49 | 121.49 | 126.31 | 126.31 |
| घसाऱ्यापोटी खर्च | 303.75 | 306.01 | 303.75 | 305.52 |
| भांडवली कर्जावरील व्याज | 152.89 | 174.48 | 117.44 | 134.15 |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | 31.77 | 40.71 | 17.27 | 17.53 |
| आयकर | - | - | - | - |
| आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | 14.45 | 28.99 | 14.45 | 29.01 |
| **एकूण महसुली खर्च** | **624.34** | **671.69** | **579.23** | **612.52** |
| अधिक: समभाग भांडवलावरील परतावा | 294.08 | 295.19 | 294.08 | 295.29 |
| **एकंदर महसुली आवश्यकता** | **918.42** | **966.87** | **873.30** | **907.81** |
| वजा: बिगर टॅरिफ उत्पन्न | 5.54 | 4.75 | 6.46 | 6.25 |
| वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | | | | |
| वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न | | | | |
| **पारेषणाकडून एकंदर महसुली आवश्यकता** | **912.88** | **962.12** | **866.84** | **901.56** |

1.21 याचिकाकर्त्याला असे निवेदन करावयाचे आहे की वित्तिय वर्ष 2023-24 आणि वित्तिय वर्ष 2024-25 चा संचित एआरआर (महसुली तफावत/(नफा) यांचा समावेश असणारा) खालीलप्रमाणे आहे.

**कोष्टक 1-9 वित्तिय वर्ष 2023-24 आणि वित्तिय वर्ष 2024-25 साठी संचित एआरआर (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | वित्तिय वर्ष 2023-24 | वित्तिय वर्ष 2024-25 |
|---|---|---|---|
| 1 | वर्तमान याचिकेमधील एआरआरचे सुधारीत अंदाज. | 962.12 | 901.56 |
| 2 | प्रकरण क्र. 290 सन 2019 मध्ये मंजूर केल्यानुसार वहन खर्चाच्या समावेशासह मागच्या वर्षाची तफावत / (वृध्दी) यांची वसुली. | 36.69 | 33.62 |

| अनु क्र. | तपशील | वित्तिय वर्ष 2023-24 | वित्तिय वर्ष 2024-25 |
|---|---|---|---|
| 3 | वित्तिय वर्ष 2013-14 ते वित्तिय वर्ष 2018-19 साठी सुधारीत ट्रुड अप एआरआर (सम्माननीय एटीइच्या निकालाचा परिणाम) | 423.69 | |
| 4 | वित्तिय वर्ष 2013-14 ते वित्तिय वर्ष 2018-19 साठी सुधारीत ट्रुड अप एआरआर वरील वहन खर्च. | 303.00 | |
| 5 | वित्तिय वर्ष 2013-14 ते वित्तिय वर्ष 2018-19 या कालावधीसाठी मंजूर झालेल्या इन्सेन्टिव्ह वर परिणाम (सम्माननीय एटीइच्या निवाड्याचा परिणाम) | 4.56 | |
| 6 | वित्तिय वर्ष 2013-14 ते वित्तिय वर्ष 2018-19 च्या सुधारीत ट्रुड अप एआरआर वर वसुल करावयाच्या अतिरिक्त इन्सेन्टिव्हसाठी वहन खर्च | 2.25 | |
| 7 | वित्तिय वर्ष 2019-20 साठी महसुली तफावत / (वृध्दी) | 138.81 | |
| 8 | वित्तिय वर्ष 2019-20 च्या महसुली तफावत / (वृध्दी) वरील वहन खर्च | 47.17 | |
| 9 | वसुलीमुळे पूर्वीच्या आयकरावरील परिणाम | 198.17 | 0.32 |
| 10 | पूर्वीच्या वसुलीमुळे आयकरावरील वहन खर्च | 29.34 | |
| 11 | वित्तिय वर्ष 2020-21 साठी महसुली तफावत / (वृध्दी) | 136.70 | |
| 12 | वित्तिय वर्ष 2020-21 च्या महसुली तफावत / (वृध्दी) वरील वहन खर्च | 36.86 | |
| 13 | वित्तिय वर्ष 2021-22 साठी महसुली तफावत / (वृध्दी) | 136.39 | |
| 14 | वित्तिय वर्ष 2021-22 च्या महसुली तफावत / (वृध्दी) वरील वहन खर्च | 25.13 | |
| 15 | वित्तिय वर्ष 2022-23 साठी महसुली तफावत / (वृध्दी) | 101.08 | |
| 16 | वित्तिय वर्ष 2015-16 ते वित्तिय वर्ष 2018-19 वरील निर्माण झालेला परिणाम.<br>- सम्माननीय एटीइ निवाडा दिनांकीत 28.11.2022 च्या प्रभावामुळे वित्तिय वर्ष 2023-24 मधील अंदाजे वसुली. | 319.72 | |
| **17** | **इन एसटीएस मार्फत एकूण अंदाजे वसुली** | **2,901.67** | **935.50** |

**सन्माननीय आयोगाकडे प्रार्थना**

वरील वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेऊन सन्माननीय आयोगाने पुढील गोष्टी कराव्यात अशी प्रार्थना याचिकाकर्ता करीत आहे:

(ए) वर्तमान याचिका दाखल करून घेणे.

(बी) ह्या याचिकेमध्ये दावा केलेला अतिरिक्त भांडवली खर्च मंजुर करण्यात यावा.

(सी) सन्माननीय आयोगाच्या केस क्र. 50 सन 2016 बाबतच्या 03.06.2021 च्या आदेशाच्या अनुसार वहनखर्चासह आर्थिक परिणामांना (रिलिफ) मंजुरी देण्यात यावी.

डी) अपील क्र. 18 सन 2019 आणि अपील क्र. 173 सन 2022 बाबत सम्माननीय एपीटीइएल यांच्या निकाल 28.11.2022 अनुसार वहन खर्चासह आर्थिक परिणाम (सवलती) यांना परवानगी देणे.

ई) वित्तिय वर्ष 2019-20 साठी वहन खर्च आणि इन्सेन्टिव्ह यांच्याबरोबरच एआरआरच्या ट्रु-अपला मंजुरी देणे.

एफ) वित्तिय वर्ष 2020-21 आणि वित्तिय वर्ष 2021-22 साठी इक्विटीवरील अतिरिक्त परतावा आणि वहन खर्च यांच्यासह एआरआरच्या ट्रु अपला मंजुरी.

जी) वित्तिय वर्ष 2020-21 च्या एआरआर नुसार परवानगी दिलेल्या वित्तिय वर्ष 2019-20 च्या कालावधी संबंधित वसुली वरील एकूण आयकराला यापुढे वहन खर्चासह परवानगी देणे.

एच) या याचिकेमध्ये सूचित केल्यानुसार वित्तिय वर्ष 2022-23 च्या एआरआरच्या तात्पुरत्या ट्रु-अपला मंजुरी देणे.

आय)या याचिकेमध्ये सूचित केल्यानुसार वित्तिय वर्ष 2023-24 आणि वित्तिय वर्ष 2024-25 च्या सुधारीत एआरआर प्रक्षेपणांना मंजुरी देणे.

जे) लागू होणाऱ्या वहन खर्चासह वरील विनंतीच्या प्रभावाची वसुली पीएसयूज्कडून करण्यास परवानगी देणे.

के) अनवधानाने कोणत्याही त्रुटी/चुका/कमतरता राहून गेल्या असल्यास त्यांना क्षमा करणे आणि पुढील तारखेस आवश्यकता वाटेल त्यानुसार या सादरीकरणामध्ये वाढ/बदल/दुरुस्ती/फेरफार करण्यासाठी व त्यानंतर पुन्हा ती सादर करणे यासाठी एमईजीपीटीसीएल यांना परवानगी देणे.

एल) सन्माननीय आयोगाला देण्यास योग्य वाटेल अशी इतर कोणतीही सूट, आदेश किंवा निर्देश देण्यास परवानगी देणे.

एम) या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेऊन सन्माननीय आयोगाला उचित आणि योग्य वाटतील अशाप्रकारे यापुढील आदेश मंजूर करणे.